# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

**डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले (कुलसचिव)**
एम.एस्सी. (भौतिकशास्त्र), पीएच.डी.

दुरध्वनी : ०७१३२–२२३१०४
ई–मेल : gug.registrar@gmail.com


जा.क्र./गोंवीग/कुसका/११०८८ /२०२०

दिनांक ०३/११/२०२०

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय :– राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२०, दशमानोत्सव व डेटा सेंटर आभासी उद्घाटन कार्यक्रमास सहभाग घेण्याबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीने १० व्या वर्षात पदार्पण केल्यानिमीत्त आगामी २०२०–२१ या वर्षभरात विविध कार्यक्रमांचे/उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या कार्यक्रम/उपक्रमांची सुरूवात **दिनांक ०७/११/२०२०** रोजी होणार आहे. सदर उद्घाटनपर कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्याचे महामहिम राज्यपाल तथा विद्यापीठाचे सन्माननीय कुलपती **मा. भगतसिंहजी कोश्यारी** हे मार्गदर्शन करणार असून विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष **मा. प्रा. डी.पी. सिंह** हे मुख्य अतिथी म्हणून मार्गदर्शन करीतील. विद्यापीठाचे कुलगुरू **प्रा. श्रीनिवास वरखेडी** हे सुध्दा या प्रसंगी विद्यापीठाची भुमिका विषद करणार आहेत. गोंडवाना विद्यापीठाचे महत्वाचे शैक्षणिक घटक म्हणून आपण व आपले महाविद्यालयाने मोठी जबाबदारीची भुमिका आजपर्यंत निभावीलेली आहे. विद्यापीठाच्या दशमानोत्सव आयोजनामध्ये आपली भुमिका अतिशय मोलाची असणार आहे.

मा. कुलगुरू महोदयांनी दिलेल्या निर्देशान्वये या आभासी उद्घाटनपर कार्यक्रमासाठी सोबतच्या माहितीपत्रक किंवा विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील दिलेल्या लिंकद्वारे मायक्रोसॉफ्ट फॉर्म भरून महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक, संस्थेचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, अशासकीय संघटनेचे पदाधिकारी तथा विद्यार्थी यांची नोंदणी करण्यासाठी कृपया विद्यापीठाचे वतीने आपण व्यक्तीशः आवाहन करावे जेणे करून सर्व घटकांना आयोजीत कार्यक्रमात सहभाग घेणे सहज शक्य हाईल, विनंतीसह.

धन्यवाद !

सहकार्याच्या अपेक्षेत.

मा. कुलगुरू महोदयांच्या आदेशान्वये

(डॉ. ईश्वर मोहुर्ले)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली